महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०८ /२०२५ दि.१७/०१/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, नवी मुंबई वाहतूक विभागाचे हद्दीत **दिनांक १८/०१/२०२५, दिनांक १९/०१/२०२५ व दिनांक २१/०१/२०२५ डॉ.डी.वाय.पाटील स्टेडियम, नेरुळ, नवी मुंबई या ठिकाणी कोल्ड प्ले या जागतिक दर्जाचे संगीत कार्यक्रमाचे आयोजन** करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीतुन नवी मुंबईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड मालवाहतुक करणाऱ्या वाहनांना ये–जा करण्यास व पार्कींग करण्यास दुपारी १४:०० ते २४:०० वा.पावेतो मनाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:– ९५९४९१०२०९

| | |
|---|---|
| **कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) ठाणे ग्रामीण, बापगाव कडुन जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड– अवजड वाहनांना गांधारी नाका येथे पडघा कल्याण रोडवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| | २) कल्याण शहरातील जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **पत्रीपुल** येथे कल्याण – शिळफाटा रोडवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) बदलापुर अंबरनाथ कडुन बदलापुर पाईपलाईन रोडने तसेच काटाई/बदलापुर चौक कडुन तळोजा बायपास रोडने नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड– अवजड वाहनांना **खोणी निर्सग नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) पनवेल कडुन कल्याण फाटा शिळफाटा मार्गे महापे कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **शिळफाटा फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |

सदर अधिसूचना दिनांक १८/०१/२०२५, दिनांक १९/०१/२०२५ दिनांक २१/०१/२०२५ रोजी दुपारी १४:०० ते रात्रौ २४:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत मा. सविनय सादर**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.

अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.

अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.

पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — १ ठाणे, परिमंडळ — २ भिवंडी, परिमंडळ — ३ कल्याण,

परिमंडळ — ४ उल्हासनगर, परिमंडळ — ५ वागळे इस्टेट.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.

प्रत :— आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.

मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

प्रत :— मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.

२/— सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/— सदर अधिसूचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CS CamScanner